पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०३/१०/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शनिवार दिनांक **०३/१०/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

**१. मा.ताकवणे नंदा विकास - सभापती**
२. मा.आर.एस.कुमार
३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
४. मा.भारती फरांदे
५. मा.पाडाळे निता विलास
६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
९. मा.कुटे चारुशीला प्रभाकर

याशिवाय मा.डोईफोडे – सहा. आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१) ज.शु.के. से.२३ येथील टप्पा-१ च्या संपवरील E-1 करिताचे पंपिंग मशिनरी टप्पा-३ च्या संपवर तातडीने हलविणेबाबत.....

विषय क्र.२) प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव प्रभागातील फुटपाथ, पाथवे पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती व देखभालीचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.नीता पाडाळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.६ मोशी येथील विविध विकास कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत – मा.नीता पाडाळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.६ मोशी गावठाणातील जुना संडासब्लॉक पाडून नवीन सुलभ शौचालय पध्दतीने संडासब्लॉक बांधणेबाबत - मा.नीता पाडाळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) वाकड आळंदी पुलाचे गॅमन कंपनीच्या कामाची माहिती सादर करणेबाबत – मा.भाऊसाहेब भोईर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २१/०७/२०१५, ३०/०७/२०१५ व ३१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ३०/०७/२०१५ व ३१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**इ**) दिनांक १८/०९/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ९ — विषय क्रमांक : १

दिनांक : ०३/१०/२०१५ — विभाग – जलशुध्दीकरण

सुचक : मा.सुरेश म्हेत्रे — अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/जशुकें/२९/२०१५, दि.२०/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.सह शहर अभियंता, पा.पु. यांचे दालनात दि.२५/०६/२०१५ रोजी पाणी पुरवठा विषयक बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदर बैठकीमध्ये मुद्दा क्र.३ नुसार ज.शु.कें. से.२३ येथील टप्पा-१ च्या संपवरील स्लॅब अत्यंत कमकुवत झाल्याने पुढील धोके टाळणेसाठी सदर ठिकाणचे पंपिंग मशिनरी टप्पा-३ च्या संपवरील पंपगृहात तातडीने हलविणेबाबत मा.सह शहर अभियंता यांनी सुचना दिलेल्या आहेत. सदरचे काम दि.३०/०७/२०१५ पर्यंत पुर्ण करणेस सांगितले आहे. उपरोक्त विषयांकित काम करणेसाठी सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता त्यास र.रु.२८,८२,१६०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम दिनांक ३०/०७/२०१५ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक असून निविदा मागवून काम करणे शक्य नाही. तरी विभागाकडील चालू कामापैकी रावेत येथील टप्पा क्र.३ व ४ अंतर्गत पंपिंग मशिनरीची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे (नि.नो.क्र.७/२-२०१४-१५) या कामातून विषयांकित काम करणे शक्य आहे. वर नमुदचे काम (नि.नो.क्र.७/२-२०१४-१५) निविदा र.रु.३८,७३,५२२/-

असून ५.५% कमी दराने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८९५९ दिनांक २८/१०/२०१४ अन्वये मंजूर करणेत आलेले आहे. आज अखेर सदर कामावर र.रु.४,८३,६९८/- इतका खर्च झाला असून र.रु.३१,७६,७८०/- इतकी रक्कम शिल्लक आहे. वरील विषयांकित काम नि.नो.क्र.७/२-२०१४-१५ या कामातून करणेचे झाल्यास कामाच्या साईट बदलाबाबत मा.विधी समिती सभेची मान्यता मिळणे आवश्यक असल्याने से.२३ येथील टप्पा-१ वरील E-1 चे पंप टप्पा-३ वर शिफ्ट करणेसाठी सदरचे काम नि.नो.क्र.७/२-२०१४-१५ मधून करुन घेणेस व साईटबदल करणेच्या कामास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १० विषय क्रमांक : २

दिनांक : ०३/१०/२०१५

सुचक : मा.नीता पाडाळे अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.नीता पाडाळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव प्रभागातील फुटपाथ, पाथवे पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती व देखभाल करणे, या कामास र.रु.१२,००,०००/- प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामांतर्गत पिंपळे गुरव येथील विविध फुटपाथ, पाथवे व पेव्हींग ब्लॉकची देखभाल व दुरुसतीची कामे करणे नागरिकांच्या सोईच्यादृष्टीने गरजेचे आहे. त्यासाठी वरील कामास र.रु.१९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणीस लाख फक्त) पर्यंत सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०३/१०/२०१५

सुचक : मा.नीता पाडाळे अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.नीता पाडाळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.६ मोशी येथील खालील कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.६ मोशी देहू रस्त्यालगतचे रस्ते डांबरी करणे. (नि.नो.क्र.३५/०७ – २०१४-१५) | २८,००,०००/- | ५०,००,०००/- | २२,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.६ मोशी तुपेवस्ती, गायकवाडवस्ती येथील रस्ते डांबरीकरण करणे. (नि.नो.क्र. | ३०,००,०००/- | ५०,००,०००/- | २०,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३५/०५ – २०१४-१५) | | | |
| ३ | प्रभाग क्र.६ मोशी येथील सुनिल नगर व राधाकृष्णनगर येथील रस्ते खडीमुरुम व डांबरीकरण करणे. (नि.नो.क्र. ३५/१२ – २०१४-१५) | ३०,००,०००/- | ५०,००,०००/- | २०,००,०००/- |
| ४ | प्रभाग क्र.६ मोशी उर्वरित ठिकाणी डांबरी रस्ते करणे. (नि.नो.क्र. ३५/०६ – २०१४-१५) | ३४,००,०००/- | ५०,००,०००/- | १६,००,०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२ विषय क्रमांक : ४

दिनांक : ०३/१०/२०१५

सुचक : मा.नीता पाडाळे अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.नीता पाडाळे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.६ मेशी येथे सार्वजनिक स्वच्छतागृहाची आवश्यकता आहे. तथापि मनपाच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात विषयांकित कामास र.रु.३०,००,०००/- एवढी प्रशासकीय मान्यता आहे. परंतु विषयांकित कामास र.रु.४९,५०,०००/- इतक्या प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे. सबब प्रस्तुत कामास र.रु.४९,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त) इतक्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३ विषय क्रमांक : ५

दिनांक : ०३/१०/२०१५

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ : मा.भाऊसाहेब भोईर, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

वाकड आळंदी पुलाचे गॅमन कंपनीच्या कामाच्या संदर्भात सदर कंपनीस काम केंव्हा देण्यात आले, कामाची मुदत काय होती, कामास किती वेळा मुदतवाढ देण्यात आली, काम मुदतीत न होण्याची कारणे, कामाची अंदाजपत्रकीय किंमत काय होती, कामाच्या किंमतीस किती वेळा सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे याबाबत संबंधित विभागाने माहिती सादर करणेबाबत सन्मा.सदस्यांची मागणी असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( नंदा विकास ताकवणे )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७१७/२०१५
दिनांक : ०७/१०/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-15-16\proceeding 3_Vidhi.doc